सत्यमेव जयते
*महाराष्ट्र शासन. जलसंपदा विभाग,*
*कोयना संकल्पचित्र मंडळ*
*जलसंपत्ती भवन, कर्वे पुतळ्याजवळ, कोथरूड, पुणे-४११ ०३८,*
*दूरध्व-नी ०२०-२५४६८९८२ फॅक्स:०२०-२५४४५७६३*
*ई मेल - :* sekdc_pune@wrd.maharashtra.gov.in

*फ़क्त ई मेल द्वारा*

जा.क्र.कोसंचिमं/डिजीटल सर्व्हिस/ ४१२९/२०१४ दिनांक: ११/१२/२०१४

प्रति,

सर्व मा. कार्यकारी संचालक / मा. महासंचालक, जलसंपदा विभाग
सर्व मा. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग
सर्व अधिक्षक अभियंता, जलसंपदा विभाग
सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग

| | |
|---|---|
| **विषय:-** | **जलसंपदा विभागाअंतर्गत असलेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांचेकरीता ई-सेवा पुस्तक ही प्रणाली राबविणेबाबत** |
| **संदर्भ:** | 1) जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. ई प्रशा-२०१४/(२५१/१४)/लपा-१, दि. ११/११/२०१४<br>2) कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांचे पत्र क्र. ३०२८/२०१४, दि. ११/११/२०१४<br>3) जलसंपदा विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र. संकीर्ण2014/251/14/लपा-१, दि. १८/११/२०१४<br>4) कार्यकारी अभियंता, प.व्य. ई-प्रशासन, यांचे पत्र क्र. पी.एम.ओ. /४०१, दि. २५/११/२०१४ |

संदर्भिय शासन निर्णय क्र. १ च्या अनुषंगाने जलसंपदा विभागातील सर्व कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा विषयक माहितीकरीता “ई-सेवा पुस्तक” ही प्रणाली अनिवार्य केलेली आहे. सदर ई-सेवा पुस्तक प्रणाली राबविण्यासाठी संदर्भिय पत्र क्र. २ व ३ अन्वये सविस्तर सुचना निर्गमित केल्या आहेत. संदर्भ पत्र क्र. ४ अन्वये सदर प्रणालीमध्ये संबंधित DDO यांनी माहिती भरण्यासाठी दि. ८/१२/२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. या अनुषंगाने सदर कार्यवाही पुर्ण होणे आवश्यक होते.

या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार, जलसंपदा विभागांतर्गत महामंडळ, प्रादेशिक, मंडळ, विभाग, उपविभाग, सिंचन शाखा व इतर कार्यालये अशी सुमारे २६५०+ कार्यालये आहेत. या सर्व कार्यालयांच्या नोंदी ई-सेवा पुस्तकात संबंधित DDO यांनी करुन, त्या कार्यालयांतर्गतच कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची माहिती भरणे अपेक्षित होते. तथापि, ई-सेवा पुस्तक प्रणालीमध्ये आजतागायत ५७२ DDO यांनी ८६२ कार्यालयांची नोंदणी केलेली आहे. याचाच अर्थ दि. ८/१२/२०१४ रोजीची मुदत उलटुन गेल्यानंतरही अजुनही १७८८+ कार्यालयांची नोंद प्रणालीमध्ये करावयाची राहिलेली आहे. या कार्यालयाकडे उपलब्ध असलेला कार्यालयांचा तपशिल तसेच ई-सेवा पुस्तक प्रणालीमध्ये भरलेल्या कार्यालयांचा तपशील सोबतच्या प्रपत्र क्र. १ मध्ये जोडण्यात आला आहे. ई-सेवा पुस्तक प्रणालीबाबत आता खालील प्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**अ) DDO यांचेमार्फत कार्यालये व पदांची नोंदणी करण्याची कालमर्यादा:-**

ई-सेवा पुस्तक प्रणालीमध्ये DDO यांना कार्यालयांची तसेच कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची नोंदणी करण्यासाठी **दि. ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानंतर मात्र कोणतीही नोंदणी प्रणालीमध्ये करता येणार नाही.**

**आ) प्रणालीमध्ये कार्यालयांची नोंदणी करुनच अधिकारी / कर्मचारी यांची नोंदणी करणे:-**

ई-सेवा पुस्तल प्रणालीमध्ये प्रथमतः सर्व कार्यालये - जसे प्रादेशिक / मंडळ / विभाग / उप-विभाग / सिंचन शाखा आदी यांची नोंदणी करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे कार्यालय नोंदविल्यानंतर त्या कार्यालयामध्ये कार्यरत असलेले अधिकारी / कर्मचारी यांची नोंदणी करावयाची आहे. विशेषकरुन सिंचन शाखा हे देखील वेगळे कार्यालय प्रणालीमध्ये उपलब्ध आहे, त्यामुळे त्यांची माहिती उपविभागांतर्गत भरण्यात येऊ नये. अशा प्रकारे नोंदणी केलेली असेल तर ती delete करुन उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी.

**इ) कार्यालयांच्या माहितीमधील तृटी:**

या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार जलसंपदा विभागांतर्गत असलेल्या कार्यालयांचा तपशील सोबत Excel Sheet मध्ये देण्यात आला आहे, ज्या आधारे प्रपत्र-१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अहवाल तयार करण्यात आला आहे. सदर कार्यालयांच्या संख्येत, रचनेत, नावात काही बदल असल्यास किंवा इतर कोणतीही तृटी असल्यास तात्काळ ae1trg.pmo@gmail.com या ई-मेलवर त्याबाबत कळविण्यात यावे.

**ई) प्रणालीमध्ये कार्यालय / पद उपलब्ध करुन देणे:-**

प्रणालीमध्ये एखादे कार्यालय / पदनाम उपलब्ध नसणे, नावात चुक असणे, आदी तृटींबाबत तात्काळ श्री. नंदकिशोर रणवरे, सहा. अभियंता-१ यांना ae1trg.pmo@gmail.com या ई-मेलवरच कळवावे. नव्याने निर्माण करावयाच्या कार्यालयाचे नाव व ते कार्यालय ज्या प्रादेशिक / मंडळ / विभागिय / उप-विभागिय कार्यालयांतर्गत आहे, त्याचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे व संबंधितांचा मोबाईल क्रमांक देखील नमुद करावा. कृपया पत्र फक्त ई-मेल द्वारेच पाठवावे, हार्ड कॉपी पोस्टाने पाठविण्यात येऊ नये.

**उ) नोंदणी पुर्ण झाल्यानंतर प्रादेशिक कार्यालयांनी प्रमाणपत्र सादर करणे:-**

प्रादेशिक कार्यालयांतर्गत असलेल्या सर्व कार्यालयांची नोंदणी व कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांची नोंदणी ई-सेवा पुस्तकात झाल्यानंतर संदर्भिय पत्र क्र. ३ मध्ये दिलेल्या विहित प्रपत्रामध्ये प्रमाणपत्र प्रादेशिक कार्यालयांनी दि. ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत या कार्यालयास सादर करावे. सदर प्रमाणपत्रामध्ये त्यांचे कार्यालय तसेच प्रादेशिक कार्यालयांतर्गत असलेले सर्व मंडळे, विभागिय, उपविभाग, सिंचन शाखा, आदी सर्वांचा समावेश करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्राचा नमुना माहितीस्तव पुनश्चः प्रपत्र -३ नुसार सोबत जोडण्यात येत आहे. आजतागायत या कार्यालयास प्रपत्र क्र. २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्यालयांनी त्यांचे स्तरावर प्रमाणपत्र सादर केलेले आहे, त्यांचे अभिनंदन!

**ऊ) ई-सेवा पुस्तक प्रणालीमध्ये वैयक्तिक माहिती भरणे:-**

सद्यस्थितीत, जोपर्यंत जलसंपदा विभागातील सर्व कार्यालये आणि सर्व अधिकारी व कर्मचारी यांची DDO मार्फत नोंदणी पुर्ण होत नाही, **तोपर्यंत सदर प्रणालीमध्ये वैयक्तिकरित्या सेवा पुस्तकामध्ये माहिती भरण्याची प्रक्रिया थांबविण्यात आली आहे**.

**ऋ) वैयक्तिक माहिती भरणेस्तव प्रशिक्षणाबाबत:-**

सदर वैयक्तिक माहिती भरण्यासाठी केवळ ई-लर्निंगच्या माध्यमातुन व्हिडिओ व User Manual मार्फतच प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामध्ये काही अडचण आल्यास, क्षेत्रीय स्तरावरुन त्याची सोडवणुक

व्हावी या दृष्टीने, सर्व DDO तसेच मास्टर ट्रेनर्स यांना दृकश्राव्य माध्यमाद्वारे प्रशिक्षित करण्यात येईल. याबाबत लवकरच सुचित करण्यात येईल.

**ऌ) विसरलेला पासवर्ड Reset करणे:-**

ई-सेवा पुस्तक प्रणालीचा पासवर्ड विसरला असल्यास, तो reset करण्याची ऑनलाईन सुविधा मुख्य पानावर लॉगीन विन्डोच्या खाली लिंक देऊन उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यासाठी आवश्यक माहिती भरल्यानंतर प्रणालीमार्फत ई-मेल किंवा मोबाईल वर One Time Password पाठविण्यात येईल व तो वापरुन विसरलेला पासवर्ड reset करता येईल. त्यामुळे पासवर्ड Reset करण्याच्या विनंती या कार्यालयास अथवा महाऑनलाईन यांना पाठविण्यात येऊ नयेत.

**ऍ) अडचणींबाबत संपर्क साधा:-**

प्रणालीबाबत कोणतीही अडचण आल्यास, प्रथमतः **महाऑनलाईन** यांचेशी संपर्क साधावा. त्यांचेमार्फत अडचणीची सोडवणुक न झाल्यास श्रीमती. मराठे, प्रथम लिपिक, कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांना संपर्क साधावा. त्यानंतरही अडचण असल्यास मुळ तक्रारीसह श्रीमती. धनश्री लिमये, स.अ.-१ यांना अथवा श्री. नंदकिशोर रणवरे, स.अ.-१ यांना या ई-मेल द्वारेच संपर्क साधावा.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करुनही सोडवणुक न झाल्यास, संबंधित DDO यांनी **श्री. प्रविण कोल्हे, कार्यकारी अभियंता, ई-प्रशासन, पुणे** यांचेशी या ईमेल वर दुरध्वनीद्वारे संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| प्रथम स्तर | ×**महाऑनलाईन लिमिटेड** (Tel:- 022-61316400)<br>×email:- support@mahaonline.gov.in) |
| द्वितिय स्तर | ×**श्रीमती. मराठे, प्र.लि., कोसंमं, पुणे** (Tel:- 020-25445765 / 25420090)<br>×email: sekdc_pune@wrd.maharashtra.gov.in |
| तृतीय स्तर | ×**श्री. नंदकिशोर रणवरे, स.अ.-१** (ae1trg.pmo@gmail.com)<br>×**श्रीमती. धनश्री लिमये, स.अ.-१** (ae1pm.pmo@wrd.Maharashtra.gov.in) |
| अंतिम स्तर | ×**श्री. प्रविण कोल्हे, कार्यकारी अभियंता, प.व्य., पुणे** (Tel: 020-25445765)<br>eecm.pmo@wrd.maharashtra.gov.in |

**ऎ) Knowledge Store:-**

ई-सेवा पुस्तक प्रणालीबाबत आजतागायत निर्गमित केलेले परीपत्रके, User Manuals, FAQ, व्हिडिओ आदी तपशील जलसंपदा विभागाचे संकेतस्थळ https://wrd.maharashtra.gov.in/ यावर “जलसंपदा कर्मचारी” या टॅब अंतर्गत “ई-सेवा पुस्तक” या टॅब अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आले असुन संदर्भासाठी तेथे वेळोवेळी भेट द्यावी.

करीता माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव सादर.

**अधीक्षक अभियंता**
कोयना संकल्पचित्र मंडळ,
पुणे

सहपत्रः-

१) प्रपत्र १ : ई-सेवा पुस्तक प्रणालीमध्ये भरलेल्या माहितीची सद्यस्थिती
२) प्रपत्र २ः माहिती भरुन पडताळणी प्रमाणपत्र सादर केलेल्या कार्यालयांचा तपशील
३) प्रपत्र ३ः ई-सेवा पुस्तक प्रणालीमध्ये नोंदणी केल्याबाबत प्रादेशिक स्तरावरुन या कार्यालयास सादर करावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना
४) या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार कार्यालयांचा तपशील

प्रतिलिपीः मा. प्रधान सचिव, (जसंवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय मुंबई (लक्षवेधः डॉ. संजय बेलसरे, उपसचिव) यांना माहितीस्तव सविनय सादर.

# प्रपत्र १ : ई-सेवा पुस्तक प्रणालीमध्ये भरलेल्या माहितीची सद्यस्थिती

| अ. क्र. | प्रादेशिक कार्यालयाचे नाव | या कार्यालयाकडे उपलब्ध माहितीनुसार प्रादेशिक कार्यालया अंतर्गत असलेल्या कार्यालयांची संख्या | | | | | | ई-सेवा पुस्तक प्रणालीमध्ये नोंदणी केल्यानुसार प्रादेशिक कार्यालयांतर्गत असलेल्या कार्यालयांची संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रादेशिक कार्यालय | मंडळ कार्यालये | विभागिय कार्यालये | उप-विभागिय कार्यालये | सिंचन शाखा | एकुण | प्रादेशिक कार्यालय | मंडळ कार्यालये | विभागिय कार्यालये | उप-विभागिय कार्यालये | सिंचन शाखा | एकुण |
| १) | CE, WRD, Pune | 1 | 4 | 19 | 97 | 133 | 254 | 1 | 6 | 24 | 60 | 2 | 93 |
| २) | CE, SP, Pune | 1 | 7 | 35 | 180 | 150 | 373 | 1 | 4 | 21 | 79 | 0 | 105 |
| ३) | CE, WRD, Aurangabad | 1 | 4 | 20 | 116 | 67 | 208 | 0 | 2 | 15 | 55 | 20 | 92 |
| ४) | CE, CADA, Aurangabad | 1 | 4 | 15 | 88 | 171 | 279 | 1 | 3 | 10 | 17 | 0 | 31 |
| ५) | CE, NMR, Nasik | 1 | 2 | 13 | 59 | 126 | 201 | 1 | 2 | 12 | 43 | 0 | 58 |
| ६) | CE, WRD, Nagpur | 1 | 3 | 16 | 76 | 131 | 227 | 1 | 7 | 26 | 93 | 0 | 127 |
| ७) | CE, Gosikhurd, Nagpur | 1 | 3 | 16 | 70 | 0 | 90 | 1 | 2 | 13 | 29 | 0 | 45 |
| ८) | CE, WRD, Amravati | 1 | 3 | 17 | 79 | 18 | 118 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| ९) | CE, SP, Amaravati | 1 | 3 | 13 | 68 | 47 | 132 | 1 | 3 | 12 | 23 | 1 | 40 |
| १०) | CE, Konkan, Thane | 1 | 4 | 18 | 89 | 23 | 135 | 1 | 5 | 18 | 54 | 4 | 82 |
| | SE, Kharland | 0 | 1 | 4 | 18 | | 23 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 1 |
| ११) | CE, TIDC, Jalgaon | 1 | 3 | 15 | 73 | 69 | 161 | 1 | 3 | 12 | 36 | 0 | 52 |
| १२) | CE, DTRS, Nasik | 1 | 15 | 45 | 48 | 0 | 109 | 1 | 10 | 5 | 0 | 0 | 16 |
| १३) | CE, Hydrology Project, Nasik | 1 | 2 | 8 | 3 | 0 | 14 | 1 | 2 | 9 | 27 | 0 | 39 |
| १४) | CE, Hydro (Civil), Pune | 1 | 2 | 12 | 29 | 0 | 43 | 1 | 2 | 10 | 5 | 0 | 18 |
| १५) | CE, Mech, Nasik | 1 | 4 | 31 | 129 | 0 | 165 | 0 | 3 | 17 | 35 | 0 | 55 |
| १६) | CE, Ele, Mumbai | 1 | 5 | 20 | 47 | 0 | 73 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| १७) | CE, MWRDC, Aurangabad | 1 | 2 | 21 | 34 | 0 | 58 | 1 | 1 | 7 | 12 | 0 | 21 |
| | TOTAL = | **17** | **71** | **338** | **1303** | **935** | **2663** | **14** | **56** | **211** | **568** | **27** | **876** |

**शा. नि. दि. ११/२/२०११ नुसार सदर पत्राची मुद्रीत प्रत पाठविण्यात येणार नाही**

## प्रपत्र २: माहिती भरुन पडताळणी प्रमाणपत्र सादर केलेल्या कार्यालयांचा तपशील

जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र .संकीर्ण 2014/251/14/लपा-१ .दि , २०१४/११/१८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे, प्रपत्र क्र. २ मधील नमुन्यामध्ये खालील कार्यालयांनी त्यांचे स्तरावर प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केलेले आहे, त्यांचे अभिनंदन! तसेच, यानंतर सदरील प्रमाणपत्र प्रादेशिक कार्यालय स्तरावर एकत्रित करुन, eecm.pmo@wrd.maharashtra.gov.in या ईमेल वर पाठविण्यात यावे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | पत्राचा दिनांक |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभियंता, लपा विभाग, सिंधुदुर्ग नगरी, ओरस | २५-११-२०१४ |
| २) | कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे | २६-११-२०१४ |
| ३) | कार्यकारी अभियंता व प्राचार्य, प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, नागपुर | २८-११-२०१४ |
| ४) | जिहे कठापुर उपसा सिंचन विभाग, सातारा | ०१-१२-२०१४ |
| ५) | अधीक्षक अभियंता, दक्षिण कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सिंधुदुर्गनगरी | ०१-१२-२०१४ |
| ६) | कार्यकारी अभियंता, नियोजन व संकल्पचित्र विभाग, दापोडी, पुणे | ०५-१२-२०१४ |
| ७) | कार्यकारी अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे | ०८-१२-२०१४ |
| ८) | महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे | ०८-१२-२०१४ |
| ९) | अधीक्षक अभियंता, कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली | ०८-१२-२०१४ |
| १०) | मृद सर्वेक्षण अधिकारी, मृद सर्वेक्षण विभाग, नागपुर | ०८-१२-२०१४ |
| ११) | कार्यकारी अभियंता, पाटबंधारे संशोधन विभाग, पुणे | ०९-१२-२०१४ |
| १२) | कार्यकारी अभियंता, पाटबंधारे संशोधन विभाग, ठाणे | ०९-१२-२०१४ |
| १३) | अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी वैजनाथ | ०९-१२-२०१४ |
| १४) | कार्यकारी अभियंता, सोलापुर पाटबंधारे विभाग, सोलापुर | ०९-१२-२०१४ |
| १५) | मृद सर्वेक्षण अधिकारी, मृद सर्वेक्षण विभाग, स्वारगेट, पुणे | ०९-१२-२०१४ |
| १६) | मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, पुणे (खुद्द)[1] | १०-१२-२०१४ |
| १७) | अधीक्षक अभियंता,भिमा कालवा मंडळ, सोलापुर | ११-१२-२०१४ |
| १८) | कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र. ९, मंगळवेढा | ११-१२-२०१४ |
| १९) | कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.3, वाशिम | ११-१२-२०१४ |

[1] आपणास विनंती करण्यात येते की आपले अधिनस्त कार्यालयांची देखील माहिती अशाच प्रकारे प्रमाणित करुन पाठवावी.

**प्रपत्र ३: ई-सेवा पुस्तक प्रणालीमध्ये नोंदणी केल्याबाबत प्रादेशिक स्तरावरुन या कार्यालयास सादर करावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना**

***(टिपः- प्रादेशिक कार्यालय प्रमाणपत्रामध्ये त्यांचे कार्यालय तसेच प्रादेशिक कार्यालयांतर्गत असलेले सर्व मंडळे, विभागिय, उपविभाग, सिंचन शाखा, आदी सर्वांचा समावेश करणे आवश्यक आहे.***

# प्रमाणपत्र

**मुख्य अभियंता कार्यालयाचे नावः ___________________________**

प्रमाणित करण्यात येते की, या प्रादेशिक कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालयांतर्गत डिडिओ रजिस्ट्रेशन, ऑफिस ॲटेचमेंट व पोस्ट असाईनमेंट इ. कार्यवाही पूर्ण झाली असून **सर्व अधिकारी / कर्मचारी** यांची ईसेवा पुस्तक प्रणाली मध्ये अचूक व अद्ययावत माहिती भरण्यात आली असून त्यांचे Log In ID सबंधितांना लेखी आदेशाव्दारे कळविण्यात आलेले आहेत व त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | अधिनस्त कार्यालयाचे नांव | DDO क्रमांक | DDO चे नांव | DDO यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल | मंजूर पदसंख्या | भरलेली पदे | रिक्त पदे | Log in ID ची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मुख्य अभियंता कार्यालय | | | | | | | |
| 2 | अधीक्षक अभियंता कार्यालय | | | | | | | |
| 3 | कार्यकारी अभियंता कार्यालय | | | | | | | |
| 4 | उप विभागीय अभियंता कार्यालय | | | | | | | |
| 5 | शाखा व इतर | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | |

स्वाक्षरी
मुख्य अभियंता
----------- प्रादेशिक विभाग

**शा. नि. दि. ११/२/२०११ नुसार सदर पत्राची मुद्रीत प्रत पाठविण्यात येणार नाही**